महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

F/C

**तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे**
**महत्त्वाचे -**

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ ०५
दिनांक :- ११ / ०१ /२०२३

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रलंबित असलेल्या ( विद्यार्थी/संस्था/विभागीय कार्यालय स्तरांवर ) अर्जांवरील कार्यवाहीबाबत-शै.वर्ष २०२२-२३.......**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २२७ दि.२४ /०८/२०२२
२. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २४४ दि.२९ /०९/२०२२
३. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची विभागीय कार्यालयांसोबतची दूरदृष्य बैठक दि.२९, ३०/११/२०२२

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** ( संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in ) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**महाडीबीटी पोर्टलद्वारे** तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या, उपरोक्त योजनांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र. १ व २ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.३ च्या विभागीय कार्यालयांसोबत घेण्यात आलेल्या दूरदृष्य बैठकीमध्ये देखील, डीबीटी पोर्टलवरील सदर योजनांचे संस्थास्तरांवर ( Pending at Institute **अंतर्गत** ) प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते.

आणि विभागीय कार्यालयांनी डीबीटी पोर्टलवर त्यांच्या लॉगीन आयडी चा वापर करुन करुन, योजना निहाय व वर्ष निहाय अर्जांच्या सद्य स्थितीच्या तपशीलामध्ये ज्या संस्थांतर्गत उपरोक्त योजनांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित ( Pending at Institute **अंतर्गत** ) आहेत, त्या संस्थासोबत आढावा बैठक घेऊन अशा संस्थांना त्यांच्या लॉगीन अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन **तात्काळ निकाली** ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तसेच वेळोवेळी संस्थास्तरांवर प्राप्त होणारे अर्ज संस्थांनी प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तरी, **दि. ११ /०१/२०२३ च्या** सोबत जोडलेल्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, विभागनिहाय, योजना निहाय व **वर्ष निहाय अर्जांच्या ( २०१८-१९ ते २०२२-२३ )**, सद्य स्थितीच्या तपशीलामध्ये प्रलंबित [ संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent back **अंतर्गत**), संस्था स्तरांवर तपासणीसाठी ( Pending at Institute **अंतर्गत** ) व विभागीय कार्यालय स्तरांवर

तपासणीसाठी ( Pending at Department अंतर्गत )] असलेल्या अर्जांची संख्या दिली आहे, जे आपल्या लॉगीनमध्ये देखील वर्षनिहाय उपलब्ध आहे.

तरी, **सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना** प्रलंबित अर्जांबाबत [ संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( Sent back अंतर्गत ), संस्था स्तरांवर तपासणीसाठी ( Pending at Institute अंतर्गत )] खालील प्रमाणे सूचित करुन प्रलंबित अर्ज त्वरीत निकाली काढण्याबाबत कळविण्यात यावे आणि जर सूचना देऊन देखील अर्ज प्रलंबित राहिल्यास त्या संस्थेच्या प्राचार्यांना बोलावून सदर प्रलंबित अर्जांवरील कार्यवाही **तात्काळ** पूर्ण करुन घ्यावी. [तसेच यापूर्वी देखील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते.]

| अ.क्र. | डॅशबोर्ड तपशील | संस्थांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज ( Pending at Institute अंतर्गत ) | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावेत.तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे.<br>तसेच जर संस्थाकडे पात्र विद्यार्थ्याच्या प्राप्त अर्जामध्ये भरण्यात आलेल्या वर्षातील संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूर नसेल तर संस्थांनी संबंधितांकडून शुल्क मंजूर करुन घेऊन अर्ज तात्काळ निकाली काढावे आणि जर विद्यार्थ्याने अर्जामध्ये अभ्यासक्रमांबाबतची चुकीची माहिती भरली असेल तर संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्ज Sent Back करुन विद्यार्थ्याकडून दुरुस्ती करुन प्राप्त करुन घ्यावे व अर्ज तात्काळ निकाली काढण्यात यावे. |
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( Sent back अंतर्गत ) | संस्थांनी **पात्र विद्यार्थ्यांना** तात्काळ बोलवून अर्जांची त्रुटी दूर करुन, अर्ज पुनःश्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेच,<br>जर संस्थेकडून **अपात्र विद्यार्थ्यांचे** अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांना सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनद्वारे रद्द (Cancel) करण्याबाबत कळविण्यात यावे किंवा असे अर्ज विद्यार्थ्याकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे. जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही. |

तसेच, विभागीय कार्यालयांना वारंवार संस्थास्तरांवर प्रलंबित असलेल्या अर्जांवरील कार्यवाहीबाबत या कार्यालयाकडून सूचित करावे लागत आहे. तरी, विभागीय कार्यालयांनी पुढाकार घेऊन त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या डीबीटी डॅशबोर्डचे ठराविक कालावधीच्या अंतराने अवलोकन करुन डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार संस्था स्तरांवर जी कार्यवाही प्रलंबित आहे ती कार्यवाही संस्थांकडून पूर्ण करुन घ्यावी आणि जी संस्था कार्यवाही पूर्ण करणार नाही त्यांना नोटीस देऊन पूर्ण करण्याबाबत सूचित करावे व कार्यवाही पूर्ण करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा. जेणेकरुन याबाबत विभागीय कार्यालयांना या कार्यालयाकडून वारंवार सूचित करावे लागणार नाही.

**तसेच विभागीय कार्यालयांनी देखील** डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले संस्थास्तरावर मंजूर झालेले अर्ज ( Pending at Department अंतर्गत ) प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. जेणेकरुन संबंधित योजनांतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद खर्च करता येईल अन्यथा तपासणीसाठी प्रलंबित अर्जाच्या कारणास्तव मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद अखर्चित राहिल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था / विभागीय कार्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/MahaDBT/शिष्यवृत्ती /२२-२३/ 235 दिनांक :- 16 JAN 2023

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

पत्रात नमुद केल्याप्रमाणे सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०१९-२० २०२०-२१ व २०२१-२२ मधील** खालील योजनांतर्गत संस्थांच्या दोन्ही लॉगीन ( **Principal & Clerk Login** ) व विद्यार्थ्यांचे लॉगीन **(Sent Back Applicant )** अंतर्गत प्रलंबित असलेले विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज , पत्रात दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करून तात्काळ मंजूर / नामंजूर किंवा विद्यार्थी सदरहू शिष्यवृत्तीस पात्र नसल्यास विद्यार्थ्यांच्या लॉगीन मधून नामंजूर (Cancel ) करण्यात यावा. व आपल्या संस्थांचा महाडिबीटी वरील Dashboard Screenshot सहित अहवाल या कार्यालयास सादर करावे.

१) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
3) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे )**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर